# ॥ नमस्कारत्रयोदशी ॥

महारुद्र जे मारुती रामदास । कलीमाजिं ते जाहले रामदास ॥
जनां उद्धराया पुन्हा प्राप्त होती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥१॥

महाराष्ट्री या माणगंगातीराते । असे पुण्य गोंदवले क्षेत्र तेथे ॥
यजुर्वेदी विप्रगृही जन्म घेती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥२॥

न लिंपे कदा बालक्रीडाउपाधी । विवेके सदा ज्ञान वैराग्य साधी ॥
जया सद्गुरूभेटीची होय स्फूर्ती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥३॥

समर्थानुयायी तुकाराम सिद्ध । जया पूर्ण वैराग्य अध्यात्मबोध ॥
तया प्रार्थुनी राममंत्रासी घेती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥४॥

तपें तोषला सद्गुरू ज्ञानियांचा । वदे वाढवी पंथ या राघवाचा ॥
कलीमाजि मंदावली धर्मभक्ती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥५॥

विदेहापरी चालवोनी प्रपंचा । मुमुक्षूजनांलागी आध्यात्मचर्चा ॥
करोनी बहू लोक ते मेळविती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥ ६॥

जशी माउली ग्रास देते मुलाला । तसे बोधुनी ज्ञान पाजी जनाला ॥
धरेसारिखी ज्या वसे नित्य शांती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥७॥

किती प्रार्थिती कामना पूर्ण व्हाया । किती भाविती देहव्याधी हराया ॥
कृपादृष्टिने त्यांसि आनंद देती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥८॥

जये गोधना संकटी रक्षियेले । किती जीव अन्नोदके तृप्त केले ॥
बहू मंदिरे स्थापिलीं, धन्य कीर्ती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥९॥

बहू अज्ञ जीवांप्रती उद्धरिलें । तसे नास्तिकां सत्पथा लावियेले ॥
समस्तांमुखे नाम हे बोलविती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥१०॥

तनू जीर्ण झाली, बहू कार्य केले । रघूनायके शीघ्र पाचारियेले ॥
तदा रामरूपी समाधिस्थ होती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥११॥

समाधी पहातां समाधान होते । तनू कष्टवी त्यासी आनंद देते ॥
मनी भाविता कामना पूर्ण होती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥१२॥

मुखे बोलवी सद्गुरू बुद्धिदाता । अहंभार हा वागवी कोण माथां ॥
जडो भावना रामदासी सदा ती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥१३ ॥